# बृहन्मुंबई महानगरपालिका – शिक्षण विभाग

जा.क्र.: उपशिअ/जिप्रकें/ओडी/ 339
दिनांक: 22/12/2015

## परिपत्रक

विषय : बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इ.1ली ते 8वीच्या वर्गांवर कार्यानुभव विषयांतर्गत संगणक शिक्षण तासिका घेण्याबाबत.

उपरोक्त विषयान्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 118 संगणक प्रयोग शाळांतील संगणक शिक्षक व 278 कार्यानुभव शिक्षकांकरिता एकूण 10 दिवसांचे संगणक शिक्षण प्रशिक्षण CACR (Citizens Association for Child Rights) हया संस्थेद्वारा पूर्ण करण्यात आले आहे.

पुर्नरचित अभ्यासक्रम 2012 अन्वये इ.1ली ते 8वी करिता कार्यानुभवातील ऐच्छिक उपक्रमांतर्गत माहिती तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये 60% भारांशाकरिता विद्यार्थ्यांचे संगणक शिक्षण घेणे अपेक्षित आहे. यास अनुसरुन CACR (Citizens Association for Child Rights) संस्थेद्वारा संगणक प्रशिक्षण प्राप्त संगणक प्रयोगशाळेतील शिक्षक व कार्यानुभव शिक्षकांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इ.1ली ते 8वीच्या विद्यार्थ्यांसाठी संगणक तासिकांचे नियोजन करुन तासिका घ्यावयाच्या आहेत. इ.1ली ते 4थी करिता नियोजित कार्यानुभवाच्या एकूण 5 पैकी 3 तासिका तर इ.5वी ते 8वी करिता नियोजित कार्यानुभवाच्या एकूण 4 पैकी 2 तासिकांमध्ये संगणक शिक्षण विषय घेण्यात यावा.

पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

शिक्षणाधिकारी
२१/१२/१५

प्रत रवाना :

सर्व उपशिक्षणाधिकारी
सर्व अधीक्षक (शाळा)
सर्व प्रशासकीय अधिकारी (शाळा)
सर्व निरीक्षक (शाळा)
यु.आर.सी. क्र.1 ते 12
कार्यानुभव विभाग